# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### राज्यातील मराठवाडा व विदर्भातील दुष्काळजन्य परिस्थितीमुळे शेतकऱ्यांची कर्जे व वीज देयके माफ करण्याबाबत

**(१) २९१५५ (१३-०१-२०१६). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मराठवाडा व विदर्भ येथील दुष्काळजन्य परिस्थितीमुळे शेतकऱ्यांची कर्जे व वीज बिल माफी देण्याबाबतची मागणी समाजवादी पक्षातर्फे जनप्रतिनिधी, समाजवादी कृषक सेवा संघ, शेतकरी व कार्यकर्ते तसेच पक्षाचे विविध सेल (विभाग) यांनी दिनांक ८ सप्टेंबर २०१५ रोजी वा त्यासुमारास लेखीनिवेदनाद्वारे मा. मंत्री (महसूल), राज्यमंत्री (महसूल), अतिरिक्त मुख्य सचिव (महसूल) तसेच संबंधित प्रशासकीय विभागाचे विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, संबंधित उपविभागीय महसूल अधिकारी तसेच विभागीय संचालक/उपसंचालक (कृषी) यांच्याकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशीअंती कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-०७-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) सन २०१५-१६ च्या खरीप हंगामात राज्यातील एकूण २७६०९ गावांमध्ये ५० पैशांपेक्षा कमी पैसेवारी आल्याने दुष्काळसदृश्य परिस्थिती जाहीर करून विविध सवलती व उपाययोजना लागू करण्यात आल्या होत्या. त्यामध्ये कृषी पंपाच्या वीज देयकात ३३.५% सुट, शेतीच्या पंपाची वीज जोडणी खंडीत न करणे व सहकारी पिक कर्जाचे पुनर्गठन या उपाययोजनांचा अंतर्भाव होता.

सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभागामार्फत दिनांक २८ जून, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये छत्रपती शिवाजी महाराज सन्मान योजना कार्यान्वित करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर आणि सांगली जिल्ह्यात पाणी आणि चारा टंचाई निर्माण झाल्याबाबत**

**(२) २९९४५ (१६-०१-२०१६). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर आणि सांगली जिल्ह्यात भिषण पाणी आणि चारा टंचाई निर्माण झाल्याने आणि चारा पुरविण्याची मागणी शासनाकडे श्रमिक मुक्ती दल संघटनेमार्फत माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती काय आढळून आले व तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-०७-२०१८) :** (१) अशंत: खरे आहे.

सोलापूर आणि सांगली जिल्ह्यात पाणी टंचाई निर्माण झाली होती. त्यानुषंगाने आवश्यक तेथे टँकरने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात आला होता. मात्र सदर जिल्ह्यात सन २०१५ खरीप हंगामात चारा टंचाई नसल्याने चारा छावणी सुरू करण्यात आली नव्हती.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्ह्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या पथदर्शी प्रकल्पाच्या सर्वेक्षणाबाबत**

**(३) ४१६३५ (१५-०५-२०१७). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्हयात राबविण्यात येणा-या पथदर्शी प्रकल्पांतर्गत सर्वेक्षणाचे काम माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान पूर्ण झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सर्वेक्षणामध्ये बुलढाणा जिल्हयातील २५ हजार शेतकरी तणावग्रस्त असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या सर्वेक्षणात निदर्शनास आलेल्या तणावग्रस्त शेतक-यांना तणावमुक्त करण्याकरिता शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-०६-२०१८) :** (१) बुलढाणा जिल्हा पथदर्शी प्रकल्पात समाविष्ट नाही.

(२) बुलढाणा जिल्ह्यात शासनाचे विविध योजनांचा लाभ अडचणीत असलेल्या शेतकरी कुटुंबांना देण्याचे उद्देशाने शेतकरी सर्व्हेक्षण २०१५ मध्ये करण्यात आले. बुलढाणा जिल्ह्यात

केलेल्या सर्व्हेक्षणानुसार एकूण १९,८०० शेतकरी अडचणीत/तणावग्रस्त असल्याचे आढळून आले.

(३) बुलढाणा जिल्हा पथदर्शी प्रकल्पात समाविष्ट नाही. परंतु जिल्हाधिकारी यांच्या पुढाकाराने व मार्गदर्शनात जिल्ह्यातील तणावग्रस्त शेतकऱ्यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ प्राथम्याने देण्याच्या हेतूने शेतकरी सर्व्हेक्षण करण्यात आले आहे. त्यानुसार अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांची यादी विविध शासकीय विभागांना पुरवून दि.२४ जुलै, २०१५ च्या शासन निर्णयातील सूचनांनुसार पात्र शेतकरी कुटुंबांना विविध योजनेचा प्राधान्याने लाभ देण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील दुष्काळ, टंचाईबाबत उपाययोजना करण्याबाबत

**(४) ५५६७६ (१५-०५-२०१७). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सतत पडणारा दुष्काळ, पावसाचे बदलत चाललेले वेळापत्रक आणि पाण्याची भीषण टंचाई यावर उपाययोजना करण्यासाठी राज्य शासनाला दुष्काळी उपाययोजना यशस्वी अंमलबजावणीसाठी स्वतंत्र खाते निर्माण करण्याची मागणी शासनाकडे होत असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील दुष्काळी भागात दुष्काळी उपाययोजना यशस्वी अंमलबजावणी करण्यासाठी स्वतंत्र खाते निर्माण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-०६-२०१८) :** (१) व (२) राज्यातील दुष्काळ, टंचाई बाबत उपाययोजना करणे व त्याची अंमलबजावणी करणे यासाठी महसुल व वन विभागाच्या मदत व पुनर्वसन या प्रभागामार्फत कामकाज पाहीले जाते. त्यामुळे स्वतंत्र खाते निर्माण करण्याचा प्रस्ताव विचाराधीन नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयात दलालांमार्फत होत असलेली फसवणूक

**(५) ७४१५४ (१२-०४-२०१७). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयात एसटीच्या चालक कम वाहक पदांच्या भरतीसाठी लागणाऱ्या परवान्यांसाठी दलाल वाहकासाठी एक हजार तर चालकासाठी पाच हजार रुपये उमेदवारांकडून घेऊन त्यांची फसवणूक करत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार संबंधितांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०४-०७-२०१८) :** (१) व (२) अशा आशयाची बातमी वृत्तपत्रात प्रसिध्द झाली होती. उप प्रादेशिक परिवहन कार्यालय बारामती कार्यालयाने चालक/वाहक अनुज्ञप्ती, बिल्ला या करिता अर्ज केलेल्या व्यक्तींकडून विहीत शुल्क आकारून व त्यांना योग्य ते मार्गदर्शन करून अनुज्ञप्ती जारी केलेल्या आहेत. याबाबत कोणत्याही तक्रारी प्राप्त झालेल्या नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शेतकरी आत्महत्यांबाबत असलेल्या शासकीय नियमांत शिथिलता आणण्याबाबत**

**(६) ७४३७७ (१३-०४-२०१७). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात नापिकी, कर्जबाजारीपणा व कर्ज परतफेडीचा तगादा आदींमुळे शेतकरी आत्महत्या करीत असतानाही गत १३ वर्षात तब्बल ४७ टक्के शेतकऱ्यांच्या आत्महत्या शासनाने अपात्र ठरविल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतकरी आत्महत्या अपात्र ठरवितांना शासकीय नियमात बसत नसल्याचे माहे डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने शेतकरी आत्महत्यांबाबत असलेल्या शासकीय नियमांत शिथिलता आणण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-०७-२०१८) :** (१) व (२) नाही.

राज्यात गेल्या १३ वर्षात एकूण २५९५९ आत्महत्या आढळून आल्या त्यापैकी १३१६८ शेतकरी आत्महत्या पात्र ठरल्या असून १२४४० आत्महत्यांची प्रकरणे शासन निर्णय दि.२३ जानेवारी, २००६ अन्वये अपात्र ठरल्या आहेत. पात्र असलेल्या १३१३६ प्रकरणातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना रु.१.०० लक्ष ची मदत देण्यात आली आहे.

(३) शेतकरी आत्महत्यांबाबत असलेल्या शासकीय नियमांत शिथिलता आणण्याबाबत दिनांक २७ फेब्रुवारी, २००६ नुसार पुढीलप्रमाणे सूचना देण्यात आल्या आहेत.

१) मृत शेतकऱ्यांच्या वारसांना मदत देण्याबाबत चौकशी करतेवेळी सदर व्यक्ती शेतकरी होता किंवा कसे याबाबत निकष सुधारण्यात आले असून मृत व्यक्तीच्या कुटुंबातील कोणतीही व्यक्ती शेतजमीन धारण करीत असेल तर सदर व्यक्तीस शेतकरी म्हणून गृहीत धरण्यात यावे.

२) सदर व्यक्तीने शेतीसाठी, शेती सुधारण्यासाठी कर्ज घेतले होते किंवा कसे याबाबत निकष सुधारण्यात येत असून मृत व्यक्तीच्या कुटुंबातील कोणत्याही व्यक्तीने राष्ट्रीयकृत बँका, सहकारी बँका, सहकारी पतसंस्था व मान्यताप्राप्त सावकार यांचेकडून कर्ज घेतले असल्यास व सदर कर्जाची परतफेड न करता आल्यामुळे कर्जाचे हप्ते प्रलंबित असल्यास सदर व्यक्तीस मदतीसाठी पात्र ठरविण्यात यावे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मराठवाडयातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणाबाबत**

**(७) ७९६४७ (१३-०४-२०१७). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडयातील दुष्काळाने आत्महत्या केलेल्या शेतक-यांच्या ५६१ अनाथ मुलांनी त्र्यबंकेश्वर येथील आधारतीर्थ आश्रमाकडे शिक्षण ,निवा-यासाठी मदत मागितली असल्याचे माहे जानेवारी, २०१७ वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आश्रमाकडे १४७७ विदयार्थ्यांची प्रतिक्षा यादी आहे त्यामुळे या मुलांच्या शिक्षण व निवा-याचा प्रश्न बिकट झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, शासनाने यासंदर्भात चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या मुलांसाठी शिक्षण व निवाराबाबत शासनाने पर्यायी व्यवस्था करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-०७-२०१८) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

मराठवाडयातील औरंगाबाद, जालना, बीड,उस्मानाबाद, परभणी, लातूर, नांदेड, हिंगोली या जिल्हयातील आत्महत्याग्रस्त, आपत्तीग्रस्त व शेतमजुरांच्या ५२३ मुलांनी शिक्षणासाठी आसरा मागितलेला आहे.

(२) सदर आश्रमाकडे महाराष्ट्रातील ७९३-मुले, ७५०-मुली असे एकूण १५४३ मुला-मुलींची प्रतिक्षा यादी आहे.

(३) होय.

(४) राज्यात इ.१० वी पर्यन्त सर्वांना मोफत शिक्षण व इ.१२ वी पर्यन्त मुलींना मोफत शिक्षण दिले जाते. तसेच टंचाईग्रस्त भागातील शालेय/महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी देण्यात येते. सदर योजनांचा लाभ आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील पाल्यांनाही होत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**यवतमाळ जिल्हयात प्रत्यक्ष पिक पाहणी प्रयोग न करता आणेवारी जाहीर केल्याबाबत**

**(८) ७९९८६ (१३-०४-२०१७). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयात महसुल व कृषी विभागाकडून आणेवारी काढण्यासाठी शेतात पाडल्या जाणा-या पिकांच्या भुखंडावर 'त्याच वेळी' (ऑन दी स्पॉट) पीक कापणी प्रयोग होत नसल्याचे, माहे जानेवारी २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महसुल व कूषी विभागाने अनेक गावांत घेतलेल्या पिक कापणी प्रयोगात एकुण ३३ भुखंड निरंक निघाले असून, खरीप हंगामात एक किलो ज्वारीचे उत्पादन झाले नसल्याचे काही तहसिलदारांनी नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रत्यक्षात पिककापणी प्रयोग न करता आणेवारी जाहीर करणा-या संबंधीत अधिका-यांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-०७-२०१८) :** (१) हे खरे नाही.

महसुल व वन विभाग शासन निर्णय दिनांक ३/११/२०१५ मधील तरतूदीनुसार यवतमाळ जिल्हयात शेतात पाडल्या जाणा-या पिकांच्या भूखंडावर याचवेळी (ऑन दी स्पॉट) आणेवारी काढण्यासाठी पिक कापणी प्रयोग महसूल विभागाकडून करण्यात आले.

(२) यवतमाळ जिल्हयात आणेवारी काढण्याकरीता टाकण्यात आलेल्या पीक कापणी प्रयोगात ज्वारी पिकाचे उत्पन्न कुठेही निरंक आलेले नाही. खरीप हंगाम २०१६ मध्ये जिल्हयात महाराष्ट्र राज्यात पिकांचे उत्पन्न कळविण्याच्या योजनेतंर्गत सोयाबीन-३७२, कापूस-७०८, तुर-५८८, ज्वारी-४४४, मुंग-२९६, उडीद-१८४ इत्यादी पिकांचे पिक कापणी प्रयोग (रॅण्डम प्लॉट) महसूल, कृषी व जिल्हा परिषद या तिनही यंत्रणा मार्फत टाकण्यात आले. यामधील ज्वारी पिकाचे ३३ पिक कापणी प्रयोगामध्ये (रॅण्डम प्लॉट) पिकाचे उत्पादन निरंक आणि नगण्य आले असल्याचे दिसून आले. या प्लॉटमध्ये येणारे उत्पन्न पैसेवारी करीता गृहीत धरण्यात येत नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पापरी (ता.मोहोळ, जि.सोलापूर) येथील शेतकऱ्याने आत्महत्या केल्याबाबत**

**(९) ८३१२७ (१३-०४-२०१७). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पापरी (ता. मोहोळ जि. सोलापूर ) येथील श्री. अरुण जगन्नाथ टेकळे (वय ५५) यांनी शेतातील उत्पनात घट झाल्याने नैराश्यातून घरासमोरील झाडाला गळफास लावून दिनांक १२ फ़ेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास आत्महत्या केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास शासनाने या प्रकारणी चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने उक्त मृत शेतक-याच्या कुटुंबाला शासनाने आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-०७-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय.

(३) शासन निर्णय दि.२३ जानेवारी, २००६ अन्वये नापिकी, राष्ट्रीयकृत बँक/सहकारी बँक किंवा मान्यताप्राप्त सावकाराकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड करू न शकल्यामुळे होणारा कर्जबाजारीपणा व कर्जपरतफेडीचा तगादा या तीन निकषामध्ये सदर प्रकरण बसत नसल्यामुळे जिल्हास्तरीय समितीद्वारे दि.०६/०३/२०१७ रोजीच्या सभेमध्ये तालुकास्तरीय समितीच्या अहवालानुसार अपात्र ठरविण्यात आले असल्याने मदत देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उस्मानाबाद मतदारसंघातील शेळी पालन व्यवसायास चालना देण्याबाबत**

**(१०) ८६८५३ (१४-०८-२०१७). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्हयाची शेळी महाराष्ट्रात प्रसिध्द असुन शेतकरी वर्गाचे गट स्थापन करुन त्यांना शेळी पालन व्यवसाय करण्यासाठी शासन आर्थिक मदत करणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उस्मानाबाद मतदारसंघातील शेतकरी वर्गाचे शेळीपालनासंबंधीचे प्रस्ताव शासनाकडे मंजूरीसाठी प्राप्त झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतीपालन व्यवसायास चालना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२०-०६-२०१८) :**(१) हे खरे नाही.

पशुसंवर्धन विभागामार्फत सन २०१७-१८ मध्ये उस्मानाबाद जिल्ह्यातील अनुसूचित जाती उपयोजना (जिल्हास्तरीय), बळीराजा चेतना अभियान व नाविन्यपूर्ण योजना या व्यक्तीगत लाभाच्या योजनेअंतर्गत ४११ लाभार्थ्यांना १०+१ शेळी गटाचा पुरवठा करण्यात आला आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रायगड जिल्ह्यातील माथेरानमध्ये पर्यावरणाकरिता ई रिक्षास परवानगी देण्याबबात**

**(११) ८८८३४ (१२-०९-२०१७). श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील माथेरानमध्ये पर्यावरणाकरीता ई रिक्षा सुरु करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे एप्रिल,२०१७ मध्ये वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांच्याकडे लेखी पत्राद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२७-०६-२०१८) :** (१) व (२) केंद्र शासनाने व राज्य शासनाने ई-रिक्षा नोंदणीचे धोरण मुक्त अवलंबिलेले आहे. माथेरान विभाग पर्यावरण संरक्षण कायद्याअंतर्गत येते. माथेरान संनियंत्रण समिती यांच्या दि.२३.०८.२०१७ रोजीच्या बैठकीतील निर्देशानुसार ई-रिक्षास परवानगी देणेबाबतचा प्रस्ताव प्रादेशिक परिवहन कार्यालय, पनवेल यांच्याव्दारा माथेरान संनियंत्रण समिती यांना दि.३०.०८.२०१७ रोजीच्या पत्रान्वये सादर करण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांगली (जि.सांगली) विभागात नविन रिक्षांचे परवाने वितरीत करण्याबाबत**

**(१२) ९३९९४ (१४-०८-२०१७). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली (जि.सांगली) विभागात नविन रिक्षांचे परवाने वितरीत करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विभागात आधीच रिक्षांचे परवाने अतिरिक्त असल्यामुळे नविन रिक्षांचे परवाने दिल्यास तेथील रिक्षाचालकांवर उपासमारीची परिस्थिती उद्वभवणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नविन रिक्षा परवाने देवू नयेत यासाठी तेथील १५ रिक्षा संघटनांनी परिवहन आयुक्त मुंबई, जिल्हाधिकारी सांगली, प्रादेशिक परिवहन अधिकारी, कोल्हापूर यांचेकडे दिनांक २८ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२०-०६-२०१८) :** (१) ते (४) दि.२६.११.१९९७ च्या अधिसूचनेव्दारे राज्यातील मुंबई शहरात चालविण्यात येणाऱ्या टॅक्सी व मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर, सोलापूर, नाशिक व औरंगाबाद या शहरातील ऑटोरिक्षांची संख्या त्या दिनांकापर्यंत सिमीत करण्याचा निर्बंध घालण्यात आलेला होता. उक्त अधिसूचनेस अनुसरून राज्यातील उर्वरित क्षेत्रात नव्याने ऑटोरिक्षा परवाने जारी करण्याबाबत राज्य परिवहन प्राधिकरणाने निर्बंध घातले होते. शासनाने दि.१७.०६.२०१७ रोजीच्या अधिसूचनेन्वये दि.२६.११.१९९७ च्या अधिसूचनेव्दारे घातलेले निर्बंध रद्द करण्याचा तसेच दि.२२.०९.२०१७ च्या शासन निर्णयान्वये राज्य परिवहन प्राधिकरणाव्दारे घातलेले निर्बंधाबाबतचे सर्व संबंधित ठराव रद्द करण्याचा निर्णय घेण्यात येवून मुक्त परवाना धोरण अवलंबिण्यात आलेले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात परिवहन विभागाने नविन टॅक्सी चालकांना परवाना देण्याचे जाहिर केल्याबाबत**

**(१३) ९५०८० (२७-१२-२०१७). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात परिवहन विभागाने मागेल त्याला रिक्षा व टॅक्सी परवाना देण्याची योजना जाहिर केली असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू धोरण अवलंबिल्याने रिक्षा व टॅक्सीच्या वाढत्या संख्येमुळे वाहतूक कोंडीचे प्रमाणसुद्धा वाढले असून गेल्या ४० ते ५० वर्षापासून रिक्षा व टॅक्सी व्यवसाय करणाऱ्या व्यावसायिकांमध्ये असंतोष निर्माण झाला, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय ?
(४) असल्यास,चौकशीअंती रिक्षा व टॅक्सी परवाने देण्याचा नेमका किती इष्टांक आहे तसेच या नवीन रिक्षा व टॅक्सी परवान्याबाबत शासनाने नियोजन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२०-०६-२०१८) :** (१), (२), (३) व (४) दि.२६.११.१९९७ च्या अधिसूचनेव्दारे राज्यातील मुंबई शहरात चालविण्यात येणाऱ्या टॅक्सी व मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर, सोलापूर, नाशिक व औरंगाबाद या शहरातील ऑटोरिक्षांची संख्या त्या दिनांकापर्यंत सिमीत करण्याचा निर्बंध घालण्यात आलेला होता. उक्त अधिसूचनेस अनुसरून राज्यातील उर्वरित क्षेत्रात नव्याने ऑटोरिक्षा परवाने जारी करण्याबाबत राज्य परिवहन प्राधिकरणाने निर्बंध घातले होते. शासनाने दि.१७.०६.२०१७ रोजीच्या अधिसूचनेन्वये दि.२६.११.१९९७ च्या अधिसूचनेव्दारे घातलेले निर्बंध रद्द करण्याचा तसेच दि.२२.०९.२०१७ च्या शासन निर्णयान्वये राज्य परिवहन प्राधिकरणाव्दारे घातलेले निर्बंधाबाबतचे सर्व संबंधित ठराव रद्द करण्याचा निर्णय घेण्यात येवून मुक्त परवाना धोरण अवलंबिण्यात आलेले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील अनधिकृत रिक्षा दंडात्मक शुल्क भरुन अधिकृत करण्याबाबत**

**(१४) ९६७७२ (२९-१२-२०१७). श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सन २०१२ नंतर घरगुती वापरासाठी घेण्यात आलेल्या अनधिकृत रिक्षा दंडात्मक शुल्क भरुन अधिकृत करण्याचा निर्णय परिवहन विभागाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आतापर्यंत किती अनधिकृत रिक्षा दंडात्मक शुल्क वसूल करुन अधिकृत करण्यात आल्या आहेत व यासाठी दंडाची रक्कम किती आहे,
(३) असल्यास, सन २०१२ पूर्वीच्या घरगुती वापरासाठी असलेल्या अनधिकृत रिक्षा अधिकृत न करण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२७-०६-२०१८) :** (१), (२) व (३) खाजगी संवर्गात नोंदणी झालेली ऑटोरिक्षा वाहने अतिरिक्त शुल्क आकारुन दि.२२.०९.२०१७ रोजीच्या शासन अधिसूचनेनुसार परिवहन संवर्गात नोंदणी करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. अशा खाजगी संवर्गातील ऑटोरिक्षांची परिवहन संवर्गात नोंदणी करण्याची अंतिम मुदत दि.३१.३.२०१८ पर्यंत होती.

दि.२२.०९.२०१७ च्या अधिसूचनेन्वये खालीलप्रमाणे शुल्क विहित करण्यात आलेले आहे-

(i) ॲटोरिक्षास प्रथम नोंदणी दिनांकापासून एक वर्षापेक्षा कमी कालावधी झाला असल्यास रूपये १,०००/-

(ii) ॲटोरिक्षास प्रथम नोंदणी दिनांकापासून एक वर्षापेक्षा अधिक आणि दोन वर्षापेक्षा कमी कालावधी झाला असल्यास रूपये २,०००/-

(iii) ॲटोरिक्षास प्रथम नोंदणी दिनांकापासून दोन वर्षापेक्षा अधिक आणि तीन वर्षापेक्षा कमी कालावधी झाल्या असल्यास रूपये ३,०००/-

(iv) ॲटोरिक्षास प्रथम नोंदणी दिनांकापासून तीन वर्षापेक्षा अधिक चार वर्षापेक्षा कमी कालावधी झाला असल्यास रूपये ४,०००/-

(v) ॲटोरिक्षास प्रथम नोंदणी दिनांकापासून चार वर्षापेक्षा अधिक कालावधी झाला असल्यास रूपये ५,०००/-

वरील योजनेखाली राज्यात माहे जानेवारी २०१८ पर्यंत एकूण ४९ वाहनांची नोंदणी झालेली असून ३७ वाहन परवाने जारी करण्यात आलेले आहेत. वाहन नोंदणीतून रू.१,२०,०००/- शुल्क आकारण्यात आलेले असून वाहन परवाने जारी केल्यापोटी रू.३,७०,०००/-एवढे शुल्क वसूल करण्यात आले आहे. शासन खाती एकूण रू.४,९०,०००/- एवढा महसूल जमा करण्यात आलेला आहे.

सदर धोरणामध्ये सन २०१२ पूर्वीच्याही ऑटोरिक्षा नियमित करण्याचे प्रयोजन केलेले आहे.

---

**स्व. गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेचा लाभ शेतमजुरांनाही मिळण्याबाबत**

**(१५) १००४९० (२७-१२-२०१७). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने शेतक-यांसाठी स्व. गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना लागू केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेचा लाभ शेतक-यांप्रमाणेच शेतमजुरांनाही देण्यात यावा अशी मागणी सदर लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेचा लाभ शेतक-यांप्रमाणेच शेतमजुरांनाही देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-०७-२०१८) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) केंद्र शासनाने प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना (वार्षिक हप्ता रु. १२/- फक्त) आणि प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना (वार्षिक हप्ता रु.३३०/-फक्त) या २ विमा योजना सुरु केलेल्या आहेत. शेतमजुर त्याचे बचत खाते असलेल्या बँकेच्या शाखेच्या माध्यमातून सदर योजनेत सहभागी होवून प्रत्येक योजनेंतर्गत प्रत्येकी रु. २ लाखांचे विमा संरक्षण मिळवू शकतो. सदर योजनांची प्रसिध्दी करुन लोकांमध्ये जनजागृती करण्याबाबत आयुक्त (कृषि) यांना शासनामार्फत निर्देश देण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अमरावती जिल्हयातील शेतकऱ्यांना सरसकट एकरी २५ हजार रुपये**
**शासनाकडून आर्थिक साहाय्य देण्याबाबत**

**(१६) १०१८१९ (२७-१२-२०१७). श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या शेतातील पिके नष्ट झाल्यामुळे व उत्पादनात घट आल्यामुळे व काही पिकांवर किडीचा प्रादुर्भाव झाल्यामुळे शेतकऱ्यावर गंभीर आर्थिक परिस्थितीत निर्माण झाल्यामुळे सरकारने शेतकऱ्यांना सरसकट एकरी २५ हजार रुपये शासनाकडून आर्थिक साहाय्य, मोबदला, अनुदान, मदत मंजूर करण्यासाठी मा. मुखमंत्री दिनांक २३ ऑक्टोबर, २०१७ रोजी अमरावती दौऱ्यावर असताना आमदार रवी राणा व असंख्य युवा स्वाभिमान पार्टी च्या पदाधिकाऱ्यांनी समक्ष भेटून निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोयाबीन पिकाला ०६ हजार रुपये प्रति क्विंटल हमी भावाने व कापसाला ०७ हजार रुपये प्रति क्विंटल हमी भावाने शासन खरेदी करणार आहे काय, तसेच शेतकऱ्यांना सरसकट एकरी २५ हजार रुपये शासनाकडून आर्थिक साहाय्य, देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०७-०७-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हंगाम २०१७-१८ साठी केंद्र शासनाने सोयाबीन करीता जाहिर केलेली किमान आधारभूत किंमत रुपये ३०५० (रुपये २८५० + रुपये २०० बोनस) आहे. बाजारात सोयाबीनला मिळणारा दर किमान आधारभूत दरापेक्षा कमी असल्याने राज्यात नाफेडच्या वतीने पणन महासंघामार्फत १८,३०९ शेतकऱ्यांकडून २,६२,८३८ क्विंटल इतके सोयाबीन खरेदी करण्यात आलेले असून, रुपये ८०.१६ कोटीचे चुकारे शेतकऱ्यांना अदा करण्यात आलेले आहेत. तसेच खरीप-२०१७ मध्ये बोंडअळीच्या प्रादुर्भावामुळे कापूस व तुडतुडे रोगाच्या प्रादुर्भावामुळे धान या पिकांच्या झालेल्या नुकसानीपोटी बाधित शेतकऱ्यांना महसूल व वन विभागाच्या शासन निर्णय क्र.सीएलएस-२०१७/ प्र.क्र.३२०/म-३, दि.१७/३/२०१८ नुसार मदत जाहिर करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चांदुर बाजार व अचलपूर (जि.अमरावती) या तालुक्यांमधील शेतक-यांची विम्याची रक्कम स्विकारुन त्यांचे अर्ज ऑनलाईन भरून घेण्याबाबत

**(१७) १०२९२० (२७-१२-२०१७). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदुर बाजार व अचलपूर (जि. अमरावती) या तालुक्यांमधील शेतक-यांकडून पीक विम्याचे अर्ज ऑफलाईन भरून घेण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतक-यांकडून पीक विम्याची रक्कम भरून घेण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतक-यांची विम्याची रक्कम तातडीने स्विकारुन त्यांचे अर्ज ऑनलाईन भरून घ्यावेत अशी मागणी सदर लोकप्रतिनिधींनी मा.कृषी मंत्री यांचेकडे दिनांक २५ ऑक्टोबर, २०१७ वा त्यासुमारास केली, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती सदरहू शेतक-यांची विम्याची रक्कम तातडीने स्विकारुन त्यांचे अर्ज ऑनलाईन भरून घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-०७-२०१८) :** (१) प्रधानमंत्री पिक विमा योजना खरीप २०१७ अंतर्गत शेतकरी सहभाग केंद्र शासनाच्या पिक विमा पोर्टलच्या माध्यमातुन ऑनलाईन पध्दतीने घेणे बंधनकारक करण्यात आले. ऑनलाईन पध्दतीने सहभागाची मुदत दिनांक ०४/०८/२०१७ अशी होती. दिनांक ०५/०८/२०१७ रोजी आपले सरकार सामुहिक केंद्रामार्फत ऑफलाईन पध्दतीने विमा प्रस्ताव स्विकारण्यात आले. चांदूर बाजार तालुक्यातील ६६१ व अचलपूर तालुक्यातील १३६२ शेतकऱ्यांनी दिनांक ०५/०८/२०१७ रोजी ऑफलाईन पध्दतीने योजनेत सहभाग घेतला.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४) दिनांक ०५/०८/२०१७ रोजी प्राप्त झालेल्या शेतकऱ्यांच्या सहभाग घेतलेल्या विमा प्रस्तावांची जिल्हानिहाय तपशीलवार माहिती आयुक्त (कृषि) यांच्याकडून मागविण्यात आलेली असून सदर माहिती प्राप्त झाल्यानंतर पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्हयातील ८३ पिडीत कुटुंबांना आर्थिक मदत देण्याबाबत**

**(१८) १०४९३९ (०१-०४-२०१८). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्हयातील ८३ पिडीत कुटुंबे मदतीपासून वंचित राहिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतकरी आत्महत्येच्या घटनांना निकषामध्ये ताडून न पहाता एक लाखाची मदत देण्याची राज्य सरकारने घोषणा केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने ८३ पिडीत कुटुंबांना आर्थिक मदत मिळवून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-०७-२०१८) :** (१) नाशिक जिल्हयात सन २०१६ मध्ये ८७ व्यक्तींनी आत्महत्या केल्या. त्यातील ४६ प्रकरणे दिनांक २६ जानेवारी, २००६ च्या शासन निर्णयातील नापिकी, राष्ट्रीयकृत बँक/सहकारी बँक मान्यताप्राप्त सावकाराकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड करु न शकल्यामुळे होणारा कर्जबाजारीपणा व कर्ज परतफेडीचा तगादा या तीन निकषात बसत असल्याने पात्र ठरविली असून ४१ प्रकरणे निकषात बसत नसल्याने अपात्र झाली आहेत.

तसेच सन २०१७ मध्ये १०४ व्यक्तींनी आत्महत्या केल्या त्यातील ५६ प्रकरणे शासन निकषानुसार पात्र झाली असून ४८ प्रकरणे अपात्र झाली आहेत.

मागील २ वर्षात अशी एकूण ८९ प्रकरणे शासन निकषात बसत नसल्याने अपात्र झालेली आहेत.

(२) नापिकी, कर्जबाजारीपणा व कर्ज परतफेडीचा तगादा या ३ निकषात बसणाऱ्या आत्महत्या प्रकरणी मदत दिली जाते.

(३) व (४) जी प्रकरणे वरील ३ निकषात बसत नाहीत त्यांना मदत अनुज्ञेय नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात भाकड जनावरांचा सांभाळ करण्यासाठी गोवर्धन केंद्रे चालू करण्याच्या योजनेला अल्प प्रतिसाद मिळाल्याबाबत**

**(१९) १०४९६२ (०१-०४-२०१८). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात भाकड जनावरांचा सांभाळ करण्यासाठी गोवर्धन केंद्रे चालू करण्याच्या राज्य सरकारच्या योजनेला अल्प प्रतिसाद मिळाल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ३ लाख भाकड जनावरांचा भविष्यात प्रश्न निर्माण होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, दुध उत्पादनात अग्रेसर असणाऱ्या जिल्ह्यांमधून सदर योजनेकरिता एकही अर्ज आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, योजनेमध्ये असणाऱ्या विविध कठोर निकषांमुळे देखील योजनेला अल्प प्रतिसाद मिळाला असल्याचे ही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर योजनेतील निकषांमध्ये योग्य ते बदल करून प्रत्येक जिल्ह्यांमध्ये गोवर्धन केंद्रे लवकरात लवकर सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२०-०६-२०१८) :** (१), (२) व (३) गोवंशाचा सांभाळ (भाकड गाई, अनुत्पदक/निरुपयोगी बैल, वळू इ.) करण्यासाठी गोशाळांना अर्थसहाय्य देण्यासाठी “गोवर्धन गोवंश सेवा केंद्र” या राज्यस्तरीय योजनेतून अनुदान मिळण्यासाठी राज्यातील ३४ जिल्ह्यांमधून एकूण १८४ संस्थाचे अर्ज प्राप्त झालेले आहेत. दूध उत्पादनात अग्रेसर असलेल्या जिल्ह्यांपैकी प्रामुख्याने सांगली, सातारा,कोल्हापूर आणि पूणे या जिल्ह्यातून अल्प प्रतिसाद मिळाला आहे. परंतु सोलापूर, उस्मानाबाद, नाशिक, बिड आणि अहमदनगर इ.जिल्ह्यांमधून या योजनेसाठी मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळाला आहे.

(४) व (५) सदर योजनेचे निकष कठोर नाहीत. त्यामुळे निकषांमध्ये सद्यस्थितीत बदल करण्याची आवश्यकता वाटत नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील पिकांचे नुकसान झालेल्या शेतक-यांना विम्या पोटी नुकसान भरपाई देण्याबाबत**

**(२०) १०५६४५ (०१-०४-२०१८). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सन २०१७ च्या हंगामात शेतक-यांचे धान, सोयाबिन, कापूस यासह अनेक पिकाचे नुकसान झालेल्या शेतक-यांना विम्या पोटी नुकसान भरपाई दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या ज्या शेतकऱ्यांनी पिकांचा विमा काढलेला आहे त्या सर्व शेतकऱ्यांना पिक विम्याची रक्कम अघापही मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांकडून पिक विमा काढण्यासाठी ज्या प्रमाणे जबरदस्ती करण्यात आली होती त्याप्रमाणे त्यांना विमा कंपनीकडून पिकाचे नुकसान भरपाईची रक्कम व विम्याची रक्कम शेतक-यांना तातडीने मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, विम्याच्या हप्त्या पोटी रकमेत महाराष्ट्र शासन व केंद्र शासनाचा वाटा किती होता ते Agriculture In Sirance Company ला कधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे ,

(५) असल्यास, सदर विम्याची रक्कम शेतक-यांच्या खात्यात केव्हापर्यंत उपलब्ध होईल,

(६) असल्यास, चौकशीअंती सदर विम्याची रक्कम उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-०७-२०१८) :** (१) प्रधानमंत्री पीक विमा योजना खरीप हंगाम २०१७ अंतर्गत पिक विमा नुकसान भरपाई नियुक्त विमा कंपनीमार्फत दिली जाते. शासनामार्फत दिली जात नाही. जिल्हासमुहांसाठी नियुक्त विमा कंपन्यांकडून प्राप्त झालेल्या अंतरीम अहवालानुसार पीक विमा नुकसान भरपाईची रक्कम रु. २३०४ कोटी इतकी आहे. सदर नुकसान भरपाई शेतकऱ्यांना प्रदान करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

(२) हे खरे नाही.

प्रधानमंत्री पिक विमा योजना खरीप २०१७ अंतर्गत राज्यातील ८१.६१ लाख शेतकऱ्यांनी सहभाग घेतलेला आहे. विमा कंपन्यांमार्फत प्राप्त अंतरिम अहवालानुसार ४५.७७ लाख शेतकरी नुकसान भरपाईस पात्र ठरले असून रु. २३०४ कोटी इतकी नुकसान भरपाई रक्कम निश्चित करण्यात आलेली आहे. त्यापैकी १२.७९ लाख शेतकऱ्यांना रु. ६८३ कोटी नुकसान भरपाई रकमेचे वाटप करण्यात आलेले आहे. उर्वरीत नुकसान भरपाई रकमेचे वाटप करण्याबाबत कार्यवाही चालू आहे.

(३) प्रधानमंत्री पिक विमा योजनेच्या मार्गदर्शक तत्वांनुसार कर्जदार शेतकऱ्यांना सदर योजना सक्तीची असून, बिगर कर्जदार शेतकऱ्यांना सदर योजना ऐच्छिक आहे. विमा कंपन्यांमार्फत नुकसान भरपाई रकमेचे वाटप शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर करण्याबाबत कार्यवाही चालू आहे.

(४) प्रधानमंत्री पिक विमा योजना खरीप २०१७ अंतर्गत ८१.६१ लाख शेतकऱ्यांनी सहभाग घेतला असून एकुण विमा हप्ता रु ३३९०.६९ कोटी इतका आहे. विमा हप्ता अनुदानातील राज्य हिस्सा रक्कम रु १५०५.८६ कोटी व केंद्र शासन हिस्सा रक्कम रु १५०५.८६ कोटी इतका आहे.

विमा हप्ता अनुदानातील राज्य हिस्सा रक्कमेपैकी रक्कम रु ११०१.३९ कोटी माहे डिसेंबर २०१७ मध्ये.व उर्वरीत ४०४.४७ कोटी माहे मार्च २०१८ मध्ये भारतीय कृषि विमा कंपनीस उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्याच प्रमाणे केंद्र शासन हिस्सा रक्कम रु. १५०५.८६ कोटी केंद्र शासनामार्फत विमा कंपन्यांना मार्च २०१८ मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

(५) विमा कंपन्यांकडून प्राप्त अंतरिम अहवालानुसार ४५.७७ लाख शेतकरी नुकसान भरपाईस पात्र ठरले असून रक्कम रु.२३०४ कोटी नुकसान भरपाई निश्चित करण्यात आलेली आहे. त्यापैकी १२.७९ लाख शेतकऱ्यांना रक्कम रु. ६८३ कोटी नुकसान भरपाई वाटप करण्यात आली असून, उर्वरित नुकसान भरपाई रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(६) विविधस्तरावर बैठकांचे आयोजन करुन योजनेंतर्गत नुकसान भरपाईस पात्र शेतकऱ्यांना नुकसान भरपाई रक्कम तात्काळ उपलब्ध करुन देण्याच्या सूचना विमा कंपन्यांना देण्यात आलेल्या आहेत. मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली सर्व पीक विमा कंपन्यांचे वरीष्ठ अधिकारी, केंद्र शासनाचे अधिकारी व राज्य शासनाचे अधिकारी यांच्या उपस्थितीत यासंदर्भात दि.३०.०५.२०१८ रोजी एक बैठक घेण्यात आलेली होती. सदर बैठकीत दि.०७.०६.२०१८ पर्यंत नुकसान भरपाईची रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्याबाबत सर्व विमा कंपन्यांना सक्त आदेश देण्यात आलेले आहेत.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सायगाव व पाटोदा (ता.येवला जि.नाशिक) येथे पशुवैद्यकीय दवाखान्यांच्या नवीन इमारती बांधण्याबाबत

**(२१) १०५७४४ (०१-०४-२०१८). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सायगाव व पाटोदा (ता.येवला, जि.नाशिक) येथील जुने पशुवैद्यकीय दवाखान्यांच्या इमारती निकामी झाल्यामुळे सदर बांधकामे निर्लेखित करून नवीन इमारती बांधण्यासाठी लोकप्रतिनिधींनी दिनांक १० मे, २०१७ व दिनांक ४ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास नाशिक जिल्हा परिषदेकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती सायगाव व पाटोदा (ता.येवला, जि.नाशिक) येथील जुने पशुवैद्यकीय दवाखान्यांच्या इमारती निकामी झाल्यामुळे सदर बांधकामे निर्लेखित करून नवीन इमारती बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२०-०६-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) सदर दोन्ही पशुवैद्यकीय दवाखान्याच्या इमारती निर्लेखनाच्या प्रस्तावास दिनांक २९.६.२०१६ रोजी जिल्हा परिषद, नाशिकच्या सर्वसाधारण सभेमध्ये ठराव क्र.८५४ व ८५५ अन्वये मंजूरी प्राप्त करून झाली आहे.
(३) उपरोक्त इमारत बांधकामाचा समावेश सन २०१८-१९ च्या कृती आराखड्यामध्ये करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पनवेल महानगरपालिकेतील टाटा मॅजिक शिवग्रामीण टॅक्सीला परवाना मिळण्याबाबत**

**(२२) १०६०७४ (०१-०४-२०१८). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पनवेल महानगरपालिका हद्दीत मिनीडोअर तीन चाकी सहा आसनीचा परवाना रद्द करून टाटा मॅजिक शिवग्रामीण टॅक्सीला चार चाकी सहा आसनी परवाना मिळण्याची मागणी लोकप्रतिनिधी माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा दरम्यान प्रधान सचिव, परिवहन विभाग, यांचेकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, टाटा मॅजिक शिवग्रामीण टॅक्सीला परवाना मिळणेबाबत प्रसिद्ध करण्यात आलेल्या शासन अधिसुचना क्र.एमव्हीआर-०२१३/प्र.क्र.६३/परि-२, दि.०४/०१/२०१७ रोजी मध्ये अटी व शर्तीतील उपनियम महापालिका क्षेत्राव्यतिरिक्त इतर क्षेत्रासाठी जारी करण्यात आल्यामुळे परवानगी बाबतीत महानगपालिका क्षेत्रामध्ये टाटा मॅजिक शिवग्रामीण टॅक्सीला परवाना अदा करता येणार नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आपल्या कुटुबियांचा उदरनिर्वाह करणा-या एकमेव साधन असलेल्या रिक्षा चालकांना महानगरपालिका हद्दीत परवाना न मिळाल्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून टाटा मॅजिक शिवग्रामीण टॅक्सीला महानगरपालिका क्षेत्रात परवाना मिळण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२८-०६-२०१८) :** (१) अशा स्वरूपाची स्थानिक रायगड जिल्हा विक्रम मिनिडोअर चालक-मालक संघ या संघटनेने मागणी केलेली आहे.
(२) ते (५) राज्य परिवहन प्राधिकरणाने सन २०१० मध्ये ठराव क्र.२४/२०१० अन्वये ६+१ आसनी रिक्षांना परवाना जारी करण्यावर निर्बंध घातले. शासनाने दि.०४.०१.२०१७ रोजीच्या अधिसूचनेव्दारे नव्याने दाखल केलेल्या उपनियमान्वये “शिव ग्रामीण टॅक्सी” तीन चाकी सहा आसनी मोटार वाहनाचा परवाना असलेल्या परवनाधारकाला ७०० सी.सी. पेक्षा कमी इंजिन क्षमता नसलेले चार चाकी वाहन महानगरपालिका क्षेत्राबाहेर बदली करण्यासाठी आहे.

शासनाने दिनांक ०४.०१.२०१७ च्या अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ चे नियम ११९ मधील उपनियम (२) नंतर पुढील प्रमाणे नव्याने उपनियम २ अ (i) व (ii) दाखल केला आहे.

सदर नियमातील तरतूद केवळ महानगरपालिका क्षेत्राव्यतिरीक्त इतर क्षेत्रासाठी जारी करण्यात आलेल्या परवान्यासाठी लागू आहे. त्यामुळे पनवेल महानगरपालिकामध्ये समाविष्ट झालेल्या गावातील चालक व मालकांना तीन चाकी सहा आसनी वाहनांऐवजी चार चाकी वाहन बदली करण्याचे प्रयोजन त्यामध्ये समाविष्ट नाही.

---

## वाळवणे (ता.पारनेर, जि.अहमदनगर) येथील बांधलेला पशुवैद्यकीय दवाखाना पाण्यावाचून बंद असल्याबाबत

**(२३) १०६५६१ (०१-०४-२०१८). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाळवणे (ता.पारनेर, जि.अहमदनगर) येथे सुमारे ७७ लाख रुपये खर्च करुन बांधलेला पशुवैद्यकीय दवाखाना पाण्यावाचून बंद असल्याचे दिनांक १८ जोनवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतक-यांच्या जनावरांना त्रास होऊ लागल्याने खाजगी पशुवैद्यकीय दवाखानात घेवुन जावे लागते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीअंती दवाखान्याला पाणी मिळण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२०-०६-२०१८) :** (१) मौजे वाळवणे, ता.पारनेर, जि.अहमदनगर येथील नवीन इमारतीमध्ये दिनांक २८.११.२०१६ पासून पशुवैद्यकीय दवाखान्याचे दैनंदिन कामकाज नियमितपणे सुरू आहे.

तथापि, सदर पशुवैद्यकीय दवाखान्यास ग्रामपंचायतीमार्फत अथवा इतर कोणत्याही योजनेतून पाणी पुरवठा होत नाही. कारण दवाखान्याची इमारत गावापासून सुमारे १ कि.मी दूर व ग्रामपंचायतीच्या पाण्याच्या टाकीच्या उंचीपेक्षा जास्त उंचावर आहे. त्यामुळे तेथे ग्रामपंचायतीचे नळ, पाणी पुरवठ्याचे पाणी पोहचू शकत नाही.

परंतु, दवाखान्यातील परिचर दररोज दैनंदिन कामकाजासाठी आवश्यक असलेले पाणी ग्रामपंचायतीच्या टाकीवरून आणत आहेत व दवाखान्याचे कामकाज सुरळीतपणे चालू आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) पशुवैद्यकीय दवाखाना, मौजे वाळवणे, ता.पारनेर, जि.अहमदनगर येथे पाईपलाईन व इलेक्ट्रीक पंपसेटद्वारे पाणीपुरवठा करण्यासाठी कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही

---

**अहमदनगर जिल्हयात गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजनेंतर्गत**
**प्रकरणे तातडीने निकाली लावण्याबाबत**

**(२४) १०७९४७ (०१-०४-२०१८). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयात गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजनेंतर्गत अपंगत्व आलेले शेतकरी तसेच मृत्यूमुखी पडलेल्या शेतक-यांची ६४ प्रकरणे विमा कंपनीकडे प्रलंबित असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू विमा प्रकरणे प्रलंबित असल्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती उक्त प्रकरणे तातडीने निकाली लावण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-०७-२०१८) :** (१) हे अशंत: खरे आहे.

अहमदनगर जिल्हयात गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजनेअंतर्गत ऑक्टोबर, २०१७ अखेर ओरिएन्टल इंशुरन्स कंपनी लि. या कंपनीकडे दि.०१ डिसेंबर,२०१६ ते ३० नोव्हेंबर, २०१७ या कालावधीचे एकुण १२७ अपघातग्रस्त शेतकऱ्यांचे प्रस्ताव मंजुरीसाठी सादर करण्यात आलेले होते. त्यापैकी, ३१ ऑक्टोबर, २०१७ अखेर ४८ प्रस्ताव मंजूर होवून त्यांची रक्कम संबंधित वारसदार यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात आलेली आहे. ४ प्रकरणे योजनेच्या

अटी व शर्तीत बसत नसल्याने ती नाकारण्यात आली आहेत व ४१ प्रकरणे विमा कंपनी स्तरावर कार्यवाहीत होती. तसेच ३४ प्रकरणे तालुका स्तरावर त्रुटींच्या पूर्ततेसाठी कार्यवाहीत होती.

आजअखेर ओरिएन्टल इंशुरन्स कंपनी यांचेकडे एकुण २०४ प्रस्ताव पाठविण्यात आलेले असून, त्यापैकी १०८ प्रस्ताव मंजूर, १३ प्रस्ताव नामंजूर, ५५ प्रस्ताव विमा कंपनीस्तरावर कार्यवाहीत व २८ प्रस्तावांबाबत संबंधित वारसदारांकडे क्षेत्रिय कार्यालयामार्फत त्रुटींच्या पूर्ततेसाठी पाठपुरावा सुरु आहे.

(२), (३), व (४) विमा प्रस्ताव शीघ्र गतीने मंजूर होण्यासाठी जिल्हास्तरावर तसेच आयुक्तालय स्तरावर विमा कंपनी व विमा सल्लागार कंपनीचे प्रतिनिधी यांच्या बैठका घेवून सातत्याने प्रकरणे निकाली काढण्यासाठी सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच त्याबाबत सातत्याने पाठपुरावा सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आटपाडी (जि.सांगली) तालुक्यातील पाण्याअभावी पिकाचे नुकसान झाल्याबाबत**

**(२५) १०८०४१ (०१-०४-२०१८). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील आटपाडी तालुक्यातील टेंभूचे पाणी तालुक्यात सर्वत्र पोहोचत नाही त्यातच पाण्याचा दर रब्बी हंगामातील ज्वारी पिकांना परवडणारा नसल्यामुळे पाणी असूनही महागडे पाणी बहुतांश शेतकरी घेत नसल्याने पाण्याअभावी पिके करपून गेल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यावर्षी आटपाडी तालुक्यात सरासरीपेक्षा अधिक पाऊस होऊनही रब्बीची पीके करपली असल्याने भविष्यात चा-याची टंचाई निर्माण होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने पाहणी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, पाहणीअंती तदनुसार शासनस्तरावर तातडीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-०६-२०१८) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

आटपाडी तालुक्यात सरासरीपेक्षा अधिक पाऊस झाल्यामुळे रब्बी पिके करपलेली नाहीत. तालुक्यातील मंडळ अधिकारी यांच्यामार्फत पाहणी करण्यात आली असून सद्यस्थितीत चारा टंचाई निर्माण होण्याची परिस्थिती नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उस्मानाबाद जिल्हयामध्ये शेतकऱ्यांना शेळी मेंढीचे पालन करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२६) १०८२११ (०१-०४-२०१८). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने शेतकऱ्यांस जोडधंदा म्हणून शेळी मेंढी पालन करण्यासाठी निधीची खास तरतुद केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उस्मानाबाद जिल्हयामध्ये सदरहु शेळी/मेंढी पालन प्रकल्पास निधी मंजूर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उस्मानाबाद जिल्हयाकरिता लोकप्रतिनिधी दिनांक ११ जुलै, २०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्र देऊन शेळी मेंढी पालन करिता रु.२० कोटीचा मागणीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला होता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीअंती निधी मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२०-०६-२०१८) :** (१) शेतकऱ्यांस जोडधंदा म्हणून शेळी,मेंढी पालन करण्यासाठी निधीची खास तरतूद करण्यात आलेली नाही. तथापि, नियमित राज्यस्तरीय / जिल्हास्तरीय योजनांमधून या बाबीसाठी खास तरतूद करण्यात आलेली आहे.

(२) बळीराजा चेतना अभियान अंतर्गत शेळी / मेंढी पालनासाठी जिल्हा परिषदेस रू.६.०० कोटी तसेच जिल्हा नियोजन समितीकडून जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद उस्मानाबाद यांना विशेष घटक योजनेमधून रू.७५.०० लक्ष इतका निधी प्राप्त झाला असून जिल्हा वार्षिक योजना आदिवासी उपयोजने अंतर्गत रू.५.०० लक्ष निधी मंजूर झाला आहे. तसेच जिल्हा परिषद सेस योजनेमधून रू.४,९९,०००/- इतका निधी मंजूर आहे. नाविन्यपूर्ण योजनेसाठीही रू.२९.४३ लक्ष इतका निधी मंजूर आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नायगाव (जि.नांदेड) तालुक्यातील शेतक-यांना पीक नुकसान भरपाई देण्याबाबत

**(२७) १०९१६५ (०१-०४-२०१८). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नायगाव (जि.नांदेड) तालुक्यात कमी पाऊस झाला असून येथील खरीप हंगामातील मुग, उडीद, सोयाबीन व कापूस इ.पीकांचे नुकसान होवुन तालुक्यात दुष्काळ पडला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यातच येथील शेकडो एकरवरील सोयाबीन पीकावर करपा रोगाचा पादुर्भाव होवून सोयाबीन उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीअंती येथील शेतक-यांना पीक नुकसान भरपाई देण्यासोबतच येथे दुष्काळी उपाययोजना लागू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-०७-२०१८) :** (१) सरासरी पेक्षा कमी पाऊस झाला असला तरी नायगाव तालुक्यात खरीप २०१७ च्या हंगामात दुष्काळ दिसून आला नाही.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) महसुल व वन विभागाच्या दिनांक २८ फेब्रुवारी, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये सन २०१७-१८ च्या खरीप हंगामात नांदेड जिल्ह्यातील ११६८ गावांची अंतिम पैसेवारी ५० पैशापेक्षा कमी असल्याने सदर गावांमध्ये खालील उपाययोजना जाहीर करण्यात आल्या आहेत.

१) जमीन महसूलात सूट.
२) सहकारी कर्जाचे पुनर्गठन.
३) शेतीशी निगडीत कर्जाच्या वसूलीस स्थगिती.
४) कृषी पंपाच्या चालू विजबिलात ३३.५% सूट.
५) शालेय/महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परिक्षा शुल्कात माफी.
६) रोहयो अंतर्गत कामाच्या निकषात काही प्रमाणात शिथिलता.
७) आवश्यक तेथे पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी टँकर्सचा वापर.
८) टंचाई जाहीर केलेल्या गावात शेतक-यांच्या शेतीच्या पंपाची वीज जोडणी खंडीत न करणे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कंधार (जि.नांदेड) येथील राज्यातील लालकंधारी गोसंवर्धन केंद्रात रिक्त पदे भरण्यासह केंद्राला स्वंतत्र इमारतीची निर्मिती करण्याबाबत**

**(२८) १०९१७६ (०१-०४-२०१८). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कंधार (जि.नांदेड) येथील राज्यातील ऐकमेव लालकंधारी गोसंवर्धन केंद्रात पशुधन विकास अधिकारी व पर्यवेक्षकाचे इतरही ८ पदे रिक्त असून पट्टीबंधक व परिचरावर केंद्राची भिस्त असल्याचे दिनांक १८ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पंचायत समितीच्या केंद्रात रिक्त पदांसोबतच अस्वच्छता, स्वच्छतागृहाची कमतरता जीर्ण इमारत यामुळे येथील कर्मचा-यांची गैरसोय व पशुधनाची परवड होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीअंती यासंदर्भात शासनाने माहिती घेवून येथील रिक्त पदे भरण्यासोबतच या केंद्राला स्वंतत्र इमारतीची निर्मिती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२०-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.
कंधार (जि.नांदेड) येथील लाल कंधारी गोसंवर्धन केंद्रासाठी एकूण ५ मंजूर पदांपैकी ३ पदे भरलेली असून २ पदे रिक्त आहेत. पशुधन विकास अधिकारी या रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार पशुधन विकास अधिकारी, पवैद श्रे-१ फुलवळ, जि.नांदेड यांच्याकडे देण्यात आलेला होता व या रिक्त पदावर दिनांक १८.४.२०१८ च्या आदेशान्वये पदस्थापना करण्यात आलेली आहे. पशुधन पर्यवेक्षक या रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार पशुधन पर्यवेक्षक, पंचायत समिती कंधार, जि.नांदेड यांच्याकडे सोपविण्यात आलेला आहे.
(२) कंधार तालुक्यातील पंचायत समिती अंतर्गत श्रे-१ व श्रे-२ असे एकूण १६ पशुवैद्यकीय दवाखाने असून पशुधन विकास अधिकारी या पदाची एकूण ११ मंजूर पदे आहेत. त्यापैकी १० पदे भरलेली आहेत, सहाय्यक पशुधन विकास अधिकारी हे १ पद मंजूर असून ते पद भरलेले आहे. तसेच पशुधन पर्यवेक्षकाची १३ मंजूर पदे असून त्यापैकी ११ पदे भरलेली आहेत.
कंधार पंचायत समितीमध्ये पानशेवडी,गोणार व हळदा हे दवाखाने ग्रामपंचायतींच्या इमारतीमध्ये सुरू आहेत व उर्वरित दवाखान्यांच्या इमारती जीर्ण झालेल्या नसून जुन्या असल्याने किरकोळ डागडुजी करण्याचे काम प्रलंबित आहे. तसेच पशुधनाची वा कर्मचाऱ्यांची कुठल्याही प्रकारची गैरसोय अथवा उपेक्षा होत नसून दवाखान्याच्या इमारतीत नियमित स्वच्छता ठेवण्यात येते व पशुपालकांना नियमित स्वरूपात सेवा पुरविल्या जातात.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ओला, उबेर, जुगनूसारख्या प्रवासी वाहतूक सेवा देणा-या कंपन्यांकडून ग्राहकांना योग्य सेवा देण्याबाबत

**(२९) १०९६०३ (०१-०४-२०१८). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ओला, उबेर, जुगनूसारख्या प्रवासी वाहतूक सेवा देणा-या कंपन्यांकडून ग्राहकांना वेठीस धरण्याचा प्रकार नागपूर शहरात वाढत असल्याचे जानेवारी २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कंपन्यांची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती ग्राहकांना योग्य सेवा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. दिवाकर रावते (२०-०६-२०१८) :** (१), (२) व (३) दि.०४.०३.२०१८ रोजीच्या अधिसूचनेन्वये "महाराष्ट्र सिटी टॅक्सी नियम, २०१७" लागू करण्यात आलेले आहे. ओला, उबेर, जुगनूसारख्या समुच्चयक सेवा देणाऱ्या कंपन्याकडून ग्राहकांना वेठीस धरण्याबाबतची कोणतीही तक्रार प्रादेशिक परिवहन कार्यालय, नागपूर (शहर) कार्यालयाकडे प्राप्त झालेली नाहीत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील शेतकऱ्याच्या आत्महत्या थांबविण्यासाठी वसंतराव नाईक शेतकरी स्वावलंबी मिशन गठीत केल्याबाबत

**(३०) १०९८४३ (०१-०४-२०१८). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शेतकरी आत्महत्यांचा वाढता आलेख खाली आणण्यासाठी राज्य शासनाने वसंतराव नाईक शेतकरी स्वावलंबी मिशन गठीत केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतकरी स्वावलंबी मिशनने याबाबतचा अभ्यास करुन अहवाल शासनास सादर केला आहे काय,
(३) असल्यास, अहवालातील शिफारशींचे स्वरुप काय आहे व त्यानुषंगाने शासनाने काय अंमलबजावणी केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे. दिनांक २४ ऑगस्ट, २०१५ च्या शासन निर्णयानुसार विदर्भातील अमरावती विभागातील सर्व जिल्हे व नागपूर विभागातील वर्धा तसेच औरंगाबाद विभागातील सर्व जिल्हे अशा एकूण १४ जिल्हयांसाठी मिशनची पुनर्रचना करण्यात आली आहे.
(२) व (३) शासनाच्या उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यासाठी शासकीय अधिकाऱ्यांसोबत आढावा बैठका घेऊन तसेच सरकार आपल्या दारी हा कार्यक्रम बळीराजा चेतना अभियान या कार्यक्रमाचा आढावा मिशनचे अध्यक्षांकडून घेतला जातो. शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी शासनाने विविध विभागांकरिता काढलेल्या शासन आदेशाच्या अंमलबजावणीबाबत त्यांचेकडून आढावा घेतला जातो.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शेतकऱ्यांना शेतमालाची किमान आधारभूत किंमत मिळत नसल्याबाबत**

**(३१) १०९९९० (१९-०४-२०१८). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल मोटे (परांडा), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खरीप सन २०१८ साठीच्या कृषीमालाच्या किंमतीबाबत पश्चिम क्षेत्रीय राज्याच्या प्रतिनिधींची बैठक सहयाद्री अतिथीगृहात माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान घेतली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शेतमालाची किंमत ठरविण्याचा अधिकार शेतकऱ्याला नसल्याने त्यात बदल करुन शेतमालाची किमान आधारभूत किंमत निश्चीत करतांना संबधीत राज्याच्या शिफारशी विचारात घेऊन न्याय देण्याची मागणी केंद्रीय कृषी मुल्य आयोगाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, सदर प्रकरणी राज्यभरातील शेतकऱ्यांना किमान आधारभूत दर देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०६-०७-२०१८) :** (१) केंद्रीय कृषी मूल्य व किंमत आयोगाचे अध्यक्ष व सदस्य सचिव यांच्यासोबत पश्चिम क्षेत्रीय राज्यांच्या प्रतिनिधींची बैठक दि. ०९/०१/२०१८ रोजी सहयाद्री राज्य अतिथिगृह, मलबार हिल, मुंबई येथे पार पडली, हे खरे आहे.

(२) होय.

(३) प्रथमच क्षेत्रीय स्तरावर जाऊन, राज्य शासनांच्या प्रतिनिधींची चर्चा करुन, खरीप हंगाम २०१८ पासुन वाजवी हमीभाव किंमतीची शिफारस केंद्र शासनाला करण्यात येणार असल्याचे केंद्रीय कृषी मूल्य व किंमत आयोगाच्या अध्यक्षांनी बैठकीत सांगीतले, वास्तविक, शेतमालाच्या किमान आधारभूत किंमती जाहीर करणे ही पूर्णपणे केंद्र शासनाच्या अखत्यारितील बाब आहे. राज्य शासन नेहमीच शेतमालाला वाजवी भाव मिळावेत म्हणून केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घेत असते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्य शासनाच्या कृषी विभागाच्या विविध शेतकरी योजनांचा ५९० कोटी रुपयांचानिधी खर्च न केल्याबाबत**

**(३२) ११०३११ (०१-०४-२०१८). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या कृषी विभागाच्या विविध शेतकरी योजनांचा ५९० कोटी रुपयाचा निधी तसाच पडून असल्याची माहिती आयुक्त कृषी यांचे कडून माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान देण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्याचे आर्थिक फायद्यासाठी इतके प्रचंड अनुदान शासनाने उपलब्ध करून देऊन सुद्धा शेतकऱ्यांचा प्रतिसाद नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,कृषी खात्याकडून शेतकरी लाभाच्या योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यास प्रचार/प्रसार होत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती कृषी खात्याकडून शेतकरी लाभाच्या योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-०७-२०१८) :** (१), (२), (३), (४) व (५) नाही. तथापि, जुलै, २०१७ मध्ये कृषि विभागाच्या अखत्यारीतील बँक खाती बंद करण्याबाबतच्या सूचना शासनस्तरावरुन कृषि आयुक्तालयास देण्यात आल्या असता, त्यास अनुसरुन विविध अनधिकृत बँक खाती बंद करुन सदर खात्यांमधील शिल्लक रक्कम जिल्हास्तरावर/आयुक्तालय स्तरावर जमा करण्यात आली.

उपरोक्तप्रमाणे बँक खाती बंद करण्यात आल्यानंतर जिल्हास्तरावर/ आयुक्तालयस्तरावर विविध बँक खात्यांमध्ये सन-२०१२ पासून ते जुलै, २०१७ अखेर रु.५८४.६१ कोटी इतका निधी शिल्लक असल्याचे आयुक्त (कृषी) यांनी सप्टेंबर, २०१७ मध्ये शासनास कळविले. सदर शिल्लक रकमेमध्ये सन २०१७-१८ मधील विविध योजनांचे अनुदान, मागील वर्षाचे पुर्नजिवीत झालेले अनुदान, सुरक्षा ठेव अनामत रक्कम, विमा, उपकर, T.D.S., इतर विभागांकडून कृषि विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयास प्राप्त निधी, बँक खात्यातील रकमांवरील व्याज इत्यादी रकमांचा समावेश असल्याचे कृषि आयुक्तालयाने कळविले असता त्यास अनुरुसरुन सन २०१७-१८ पूर्वीचा अखर्चित निधी शासन खाती जमा करण्याबाबतच्या व यासंदर्भात सविस्तर माहिती शासनास सादर करण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या. याअनुषंगाने दि.२८.०३.२०१८ पर्यंत रु.३९७.३० कोटी इतका निधी शासनाच्या खात्यात जमा करण्यात आल्याचे आयुक्तांनी त्यांच्या दि.२८.०३.२०१८ च्या पत्रान्वये शासनास कळविले आहे. कृषि आयुक्तालयाकडून सप्टेंबर २०१७ मध्ये खाते निहाय अखर्चित रक्कम व शासनाचे खात्यात भरणा करण्यात आलेली रक्कमेचा ताळमेळ पत्राने सादर करण्याची सूचना यापूर्वी देण्यात आली आहे आणि ती प्राप्त व्हायची आहे.

कृषि विभागाचा पूर्वीच्या आर्थिक वर्षामध्ये वितरीत केलेला निधी उघडलेल्या बँक खात्यांमध्ये पडून असल्याचे यावरुन दिसून आले असल्याने यासंदर्भात महालेखापाल कार्यालयामार्फत विशेष लेखापरीक्षण करण्याची विनंती महालेखापाल यांना करण्यात आलेली असून पुढील कार्यवाही सुरु आहे.

---

**अमरावती जिल्ह्याकरिता कै.वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन योजनेतील निधीबाबत**

**(३३) १११०५९ (०१-०४-२०१८). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.रणजीत कांबळे (देवळी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन योजनेअंतर्गत अमरावती जिल्ह्याकरिता २०१६-१७ मधील प्राप्त निधी अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे शेतकऱ्यांना वाटप न करता शासनास परत करण्यात आला , याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि. १२ सप्टेंबर २०१७ रोजी वा त्यासुमारास कळविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती संबंधीत दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-०७-२०१८) :** (१), (२) व (३) अमरावती जिल्ह्यासाठी कै.वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन योजने अंतर्गत सन २०१६-१७ मध्ये निधी प्राप्त झालेला नाही. कै.वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन अंतर्गत अन्न सुरक्षा योजना, राजीव गांधी जिवनदायी योजना, मोफत शिक्षणाची योजना तसेच शेती विकास संदर्भात सर्व विभागाकडील शासकीय योजना जिल्ह्यात राबविण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हातकणंगले (जि.कोल्हापूर) तालुक्यातील टोप येथे पार्किंगची व्यवस्था करण्याबाबत**

**(३४) १११४८९ (०५-०४-२०१८). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हातकणंगले (जि.कोल्हापूर) तालुक्यातील टोप येथे ग्राहकांच्या वाहनांचे पार्किग महामार्गाच्या साईडपट्टयावरच होत असल्याने अपघात होत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती बाजाराच्या दिवशी पार्किंगची व्यवस्था करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२०-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.

यासंदर्भात पोलिस विभागाकडून (पोलिस ठाणे एमआयडीसी) कोणत्याही अपघाताची नोंद नसल्याबाबतची माहिती प्रादेशिक परिवहन अधिकारी, कोल्हापूर यांना प्राप्त झालेली आहे.
(२) व (३) जिल्हा रस्ता सुरक्षा समितीच्या बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद कोल्हापूर यांनी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हातकणंगले यांचेमार्फत वाहन तळाचे योग्य नियोजन करावे व सदर ठिकाणी अपघात घडल्यास त्याची सर्व जबाबदारी ग्रामपंचायतीवर निश्चित करण्यात येईल अशा सूचना संबधितांना जारी केल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिंदखेडराजा (जि.बुलढाणा) येथील ग्रामीण भागातील प्रधानमंत्री पीक विमा योजनेबाबत**

**(३५) १११९७६ (०१-०४-२०१८). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंदखेडराजा (जि.बुलढाणा) येथील ग्रामीण भागातील आपले सरकार सेवा केंद्र ऑफलाईन राहत असल्यामुळे शेतक-यांना या योजनेसाठी ऑनलाईन अर्ज दाखल करतांना अनेक अडचणी येत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रधानमंत्री पीकविमा योजनेला मुदतवाढ देण्यात येवुनही शेतकऱ्यांना लाभ मिळाला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीअंती उक्त योजनेपासून शेतक-यांना वंचित ठेवणा-या दोषींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-०७-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

खरीप हंगाम २०१७ मधील प्रधानमंत्री पिक विमा योजनेची अंतीम मुदत दि.३१.०७.२०१७ अशी होती. सदर मुदत दि.०४.०८.२०१७ पर्यंत वाढविण्यात आलेली होती. तथापि, तांत्रिक अडचण विचारात घेवून दि.०५.०८.२०१७ रोजी शेतकऱ्यांचे अर्ज ऑफलाईन पध्दतीने स्विकारण्यात आलेले होते.

प्रधानमंत्री पीक विमा योजना रब्बी हंगाम २०१७-१८ अंतर्गत कर्जदार व बिगर कर्जदार शेतकऱ्यांनी विमा प्रस्ताव सादर करण्याचा अंतीम दिनांक १ जानेवारी २०१८ असा होता. सदर योजनेला मुदतवाढ देण्यात आलेली नव्हती. रब्बी हंगाम २०१७-१८ मध्ये बुलढाणा जिल्हयातील ३०८३ शेतकऱ्यांनी रु.२५.५० लाख इतका विमा हप्ता भरुन ५५९७ हेक्टर क्षेत्र विमा संरक्षित केलेले आहे.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उस्मानाबाद जिल्हयातील परतीच्या पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांस नुकसान भरपाई देण्याबाबत**

**(३६) ११२७८५ (०१-०४-२०१८). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यामधील विशेषत: उस्मानाबाद जिल्हयातील शेतकऱ्यांचे परतीच्या पावसामुळे नुकसान झाले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहु नुकसान झालेल्या शेतकऱ्यांचे पंचनामे शासनामार्फत करण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीअंती नुकसानग्रस्त शेतकऱ्यांस नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१०-०७-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुक्ताईनगर-बोदवड व अमळनेर (जि.जळगांव) या तालुक्यात निर्माण झालेली पाणी टंचाई**

**(३७) ११३१६१ (०१-०४-२०१८). श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव जिल्हयातील (ता.मुक्ताईनगर) तालुक्यात ५१ टक्के, बोदवड तालुक्यात ४८ टक्के व अमळनेर तालुक्यात ४८ टक्के इतके अल्पपर्जन्यमान झाल्यामुळे दुष्काळी परिस्थिती निर्माण होऊन आजच्या परिस्थितीत पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झालेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या तीन तालुक्यांमध्ये ३३ टक्क्यांच्या वर पिकांचे नुकसान झालेले असल्यामुळे नवीन नियमानुसार शासनाने दुष्काळ जाहिर करण्याबाबत निर्णय घेतलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत दिनांक २४ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्र्यांना निवेदन देऊन दुष्काळ जाहिर करण्याची मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त निर्णयाच्या अनुषंगाने आवश्यक सुविधा उदा.पिण्याचे पाणी, रोजगार, वीज पुरवठा खंडीत न करणे इत्यादीबाबत शासनाने कोणताही निर्णय घेतलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-०७-२०१८) :** (१) अंशतः खरे आहे.

जळगांव जिल्हयात माहे सप्टेंबर २०१७ अखेर मुक्ताईनगर तालुक्यात ५९.३ %, बोदवड तालुक्यात ६२.०० % व अमळनेर तालुक्यात ४७.३% इतके पर्जन्यमान झालेले आहे. पाणी टंचाई निवारणार्थ सदर तालुक्यात टँकर, विहीर अधिग्रहण, विंधन विहिर यांसारख्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

(२) मुक्ताईनगर, बोदवड व अमळनेर या तीन तालुक्यामध्ये खरीप २०१७ च्या हंगामात दुष्काळ जाहीर करण्यात आलेला नाही.

(३) हे खरे आहे.

(४) हे खरे  नाही.

सन २०१७ च्या खरीप हंगामात ५० पैसे पेक्षा कमी पैसेवारी असलेल्या राज्यातील गावांमध्ये महसुल व वन विभाग दिनांक २८ फेब्रुवारी, २०१८ च्या शासन निर्णन्वये खालील उपाययोजना जाहीर करण्यात आल्या आहेत.

१) जमीन महसूलात सूट
२) सहकारी कर्जाचे पुनर्गठन
३) शेतीशी निगडीत कर्जाच्या वसूलीस स्थगिती
४) कृषी पंपाच्या चालू विजबिलात ३३.५% सूट
५) शालेय/महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परिक्षा शुल्कात माफी.
६) रोहयो अंतर्गत कामाच्या निकषात काही प्रमाणात शिथिलता
७) आवश्यक तेथे पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी टँकर्सचा वापर
८) टंचाई जाहीर केलेल्या गावात शेतक-यांच्या शेतीच्या पंपाची वीज जोडणी खंडीत न करणे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाकेश्वर कोंढामेंढी (ता.मौदा, जि.नागपूर) येथील शेतकऱ्यांनी कर्जबाजारीला कंटाळून आत्महत्या केल्याबाबत**

**(३८) ११३२९९ (०१-०४-२०१८). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाकेश्वर कोंढामेंढी (ता.मौदा, जि.नागपूर) येथील शेतकरी संजय चावडे यांनी सततच्या नापिकी आणि कर्जाला कंटाळून दिनांक ९ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास आत्महत्या केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सहकारी संस्था आणि बँकेच्या सततच्या पाठपुराव्यामुळे सदर शेतकऱ्याला आत्महत्या करावी लागली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने मृत शेतकऱ्यांच्या वारसदारास आर्थिक मदत मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.

वाकेश्वर कोंढामेंडी (ता.मौदा, जि.नागपूर) येथील शेतकरी संजय चिंतामन चवळे, वय ३५ वर्षे यांचे अज्ञात इसमाने गळा आवळून हत्या केल्याबाबत पोलीस स्टेशन, अरोली, ता.मौदा, जि.नागपूर येथे गुन्हा नोंद आहे.

(२) नाही.

पोलीस तपासात गळा आवळून हत्या केल्याचे निष्पन्न झाले आहे.

(३) होय.

(४) सदर व्यक्तीचा मृत्यु हा शेतकरी आत्महत्या नसून हत्या असल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाल्यामुळे शेतकरी आत्महत्या अंतर्गत आर्थिक मदत देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाऊस पडतच नसल्याने राज्यातील शेतक-यांना बी-बियाणे खते आदीसाठी कोट्यवधी रूपयांचा खर्च होवून त्याची होत असलेल्या आर्थिक नुकसानीबाबत**

**(३९) ११३३४८ (०१-०४-२०१८). श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मागील अनेक वर्षापासून राज्याच्या हवामान खात्याच्या अंदाजाप्रमाणे राज्यातील बळीराजा शेतीची मशागत, पेरणी, बि-बियाने व खतांचा वापर करून त्यासाठी कोटयवधी रूपयांची रक्कम खर्च होवूनही हवामान खात्याने वर्तविल्याप्रमाणे पाऊस पडत नसल्यामुळे राज्यातील कोटयवधी शेतक-यांच्या लाखो हेक्टर शेतीवर खर्च करण्यात आलेली रक्कम वाया गेल्याचे प्रकार घडत असून बळीराजा आर्थिक अडचणीत सापडलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) राज्यातील हवामान खात्याच्या अंदाजाप्रमाणे मागील काही वर्षात शेतक-यांना दुबार प्रसंगी, त्रिबार पेरणी करण्याची वेळ आलेली असून हवामान खात्याचे अंदाज सर्रासपणे खोटे ठरण्याचे प्रकार यापूर्वी दरवर्षी घडत असल्याने शेतक-यांवर मोठे आर्थिक संकट ओढवले असून प्रसंगी शेतक-यांनी कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या केलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय

(३) हवामान खात्याने वर्तविलेले अंदाज मागील अनेक वर्षापासून खोटे व चुकीचे ठरत असतानाही याप्रकरणी हवामान खात्याविरोधात आजमितीस शासनाने कोणतीही कारवाई केलेली नाही, हेही खरे आहे काय

(४) असल्यास,हवामान खात्याने वर्तविलेले अंदाज सर्रासपणे चुकीचे ठरत असल्याने शासनाने याप्रकरणी गांभीर्याने विचार करून हवामान खात्याचे उत्तरदायित्व निश्चित करून त्याच्या विरोधात कोणती ठोस कारवाई केली आहे वा करण्यात येत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-०७-२०१८) :** (१) नाही. राज्याचे स्वतंत्र हवामान खाते नाही परंतु, भारतीय हवामान खात्याचा अंदाज व प्रत्यक्षात पडणारा पाऊस यामध्ये अंशत: तफावत आढळून येते. मुळत: मॉन्सून ही अतिशय गुंतागुंतीची हवामान संकल्पना असून वातावरणातील तत्कालीन बदलानुसार/ परिस्थितीनुसार हवामान खात्यामार्फत हवामानाचे अंदाज वर्तविले जातात. सद्यस्थितीत हवामान अंदाजांची ६५% ते ७० % अचूकता असून आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराव्दारे हवामान अंदाजाची अचूकता वाढविणे ही अव्याहत प्रक्रिया आहे. राज्यातील ८० % शेती मुख्यत: कोरडवाहू असून ती मान्सूनवर अवलंबून असल्याने पेरणी योग्य पाऊस झाल्यानंतर शेतकरी पिकांची पेरणी करतात. पेरणीनंतर हवामान विषयक स्थितीतील बदलांमुळे पावसाचा मोठा खंड आल्यास पिकांची उत्पादकता घटून शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होते. अशाप्रसंगी, प्रधानमंत्री फसल वीमा योजनेतून पीक वीमा काढलेल्या शेतकऱ्यांना विम्याची रक्कम अदा करण्यात येते. त्याचप्रमाणे उत्पादकतेत ३३ % पेक्षा अधिक घट झाल्यास राष्ट्रीय आपत्ती निवारण निधीतून शेतकऱ्यांना अर्थसहाय्य देण्यात येते. त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक हितसंबंध जपण्याचा शासन नेहमीच प्रयत्न करत आहे.

(२) नाही. मागील काही वर्षांमध्ये शेतकऱ्यांना क्वचितच दुबार व त्रिबार पेरणी करण्याची वेळ आलेली आहे. हवामान खात्याच्या अंदाजात अंशत: तफावत दिसून आलेली आहे परंतु, त्यामुळे शेतकऱ्यांवर आर्थिक संकट ओढवून त्यांनी कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या केलेल्या आहेत असे म्हणने उचित नाही.

(३) (४) भारतीय हवामान विभाग (IMD) ही केंद्रिय संस्था असल्याने सदरची बाब केंद्र शासनाच्या अखत्यारितील आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजा लसनपूर (ता.समुद्रपूर, जि.वर्धा) येथील हरिओम बाबा गोशाळेस निधीची तरतूद करण्याबाबत

**(४०) ११४२१२ (०१-०४-२०१८). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा लसनपूर (ता.समुद्रपूर, जि.वर्धा) येथील हरिओम बाबा गोशाळेस १ कोटी निधीची तरतूद करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (हिंगणघाट) यांनी दिनांक ६ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.पशुसंवर्धन मंत्र्यांना निवेदन देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती उक्त मागणीनुसार सदरहू गोशाळेस निधी मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२०-०६-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) मौजे लसनपूर, (ता.समुद्रपूर, जि.वर्धा) येथील हरिओम बाबा गोशाळेचा आवश्यक तो प्रस्ताव आयुक्त पशुसंवर्धन कार्यालयास/ शासनास प्राप्त झालेला नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रायगड जिल्हयातील माथेरान पर्यटन नगरीत हातरिक्षा ऐवजी बॅटरीवर चालणाऱ्या रिक्षांच्या मागणीबाबत**

**(४१) ११४२४६ (०१-०४-२०१८). श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्हयातील माथेरान या पर्यटन नगरीत हातरिक्षा ऐवजी बॅटरीवर चालणाऱ्या रिक्षांची मागणी तेथील श्रमिक रिक्षा चालक-मालक संघटनेने माथेरान महापालिका तसेच राज्य शासनाकडे (परिवहन) गेली दोन वर्षापासून तसेच दिनांक ७ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती रायगड जिल्हयातील माथेरान या पर्यटन नगरीत हातरिक्षा ऐवजी बॅटरीवर चालणाऱ्या रिक्षांची मागणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२०-०६-२०१८) :** (१) श्रमिक रिक्षा चालक-मालक सेवा संस्था माथेरान यांनी त्यांचे दि.२३.०८.२०१७ रोजीचे निवेदन माथेरान संनियंत्रण समितीच्या बैठकीत सादर केलेले आहे.
(२) व (३) केंद्र शासनाने व राज्य शासनाने ई-रिक्षा नोंदणीचे धोरण मुक्त अवलंबिलेले आहे. तथापि, माथेरान विभाग पर्यावरण संरक्षण कायद्याअंतर्गत येत असल्यामुळे श्रमिक रिक्षा चालक-मालक सेवा संस्था, माथेरान यांचे निवेदन व माथेरान संनियंत्रण समिती यांच्या दि.२३.०८.२०१७ रोजीच्या बैठकीतील निर्देशानुसार ई-रिक्षास परवानगी देणेबाबतचा प्रस्ताव प्रादेशिक परिवहन कार्यालय, पनवेल यांच्याव्दारा माथेरान संनियंत्रण समिती यांना दि.३०.०८.२०१७ रोजीच्या पत्रान्वये सादर करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कृषी विभागाच्या विविध योजनांसाठी मंजूर असलेल्या निधीबाबत

**(४२) ११४४३८ (०१-०४-२०१८). श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.प्रदीप नाईक (किनवट), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.विजय भांबळे (जिंतूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषी विभागाच्या विविध योजनांसाठी मंजूर असलेला निधी फेब्रुवारी महिन्यापर्यंत खर्च करावा तसेच योजनेत जास्तीत जास्त शेतकऱ्यांना सहभागी करुन घेण्याचे दृष्टीने प्रयत्न करुन त्यानुसार प्रत्येक जिल्हयाचा स्वतंत्र असा ५ वर्षाचा आराखडा तयार करण्याबाबतच्या सूचना कृषी आयुक्तांनी दिल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार कोणकोणत्या जिल्हयांचा असा आराखडा आतापर्यंत तयार करण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, या आराखडयामध्ये कोणकोणत्या बाबींचा/योजनांचा प्राधान्याने समावेश करण्यात आला आहे काय,

(४) असल्यास, ज्या जिल्हयांनी अशाप्रकारचा आराखडा केला नसल्यास, संबंधिताविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ,

(५)नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-०७-२०१८) :** (१) होय.

दि.२७ व २८ जानेवारी, २०१८ च्या बैठकीमध्ये आयुक्त (कृषी) यांनी प्रस्तुत प्रकरणी पुढील ५ वर्षांचे कृती आराखडे तयार करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

(२) व (३) कृषि विभागाच्या सर्व योजनांचा समावेश करुन राज्यातील शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीसाठी फळे व भाज्यांची विक्री व्यवस्था, प्रक्रिया आणि फळांच्या निर्यातीवर भर देऊन सर्व जिल्हयांचे पुढील ५ वर्षांचे आराखडे तयार करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खरीप हंगामात पिक विमा न भरलेल्या मराठवाड्यातील शेतकऱ्यांना आर्थिक मदत न मिळाल्याबाबत

**(४३) ११५२५८ (०१-०४-२०१८). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खरीप सन २०१६ हंगामातील पिकांची अंतिम पैसेवारी ५० पैशांपैक्षा कमी आलेल्या राज्यातील ६४७ गावांतील पीक विमा न काढलेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाईच्या ५० टक्के रक्कम देण्याबाबत दिनांक १० फेब्रुवारी, २०१७ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) सदरहू शासन निर्णयात ५० पैशांपेक्षा कमी पैसेवारी असलेल्या गावांमध्ये मराठवाड्यातील एकाही गावाचा समावेश करण्यात आलेला नाही, तसेच मराठवाड्यातील केवळ कापूस उत्पादक शेतकऱ्यांचा समावेश करण्यात आल्याने मराठवाड्यातील मोठ्या प्रमाणावर इतर पिके घेणारे शेतकरी हवालदिल झाले आहेत, हे हि खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती उपरोक्त शासन निर्णयात सुधारणा करून सन २०१६ मधील खरीप हंगामात पिक विमा न भरलेल्या व कापसाव्यतिरिक्त इतर पिके घेणाऱ्या मराठवाड्यातील शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-०७-२०१८) :** (१) या हंगामातील पिक नुकसानीमुळे बाधीत झालेल्या शेतक-यांना मदत देताना ज्या शेतक-यांनी प्रधानमंत्री पिक विमा योजनेंतर्गत पिक विमा काढलेला आहे अशा शेतक-यांना प्रधानमंत्री पिक विमा योजनेंतर्गत मंडळनिहाय भरपाईची जी रक्कम देय असेल त्या रक्कमेच्या ५०% रक्कम प्रधानमंत्री पिक विमा योजनेत सहभागी नसलेल्या शेतक-यांना शासनाकडून मदत म्हणून देण्यात येईल.

(२) अंशतः खरे आहे.

सन २०१६ मधील खरीप हंगामात ५० पैशांपेक्षा कमी पैसेवारी आलेल्या गावांत मराठवाड्यातील एकाही गावाचा समावेश नसल्याने कापूस उत्पादक किंवा इतर पिके घेणा-या शेतक-यांचा समावेश करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बुलढाणा जिल्ह्यातील वाढत्या शेतकरी आत्महत्या रोखण्याबाबत

**(४४) ११५३२४ (०१-०४-२०१८). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयामध्ये सन २०१७ या वर्षात शेतकरी कुटूंबातील ३०५ सदस्यांनी आत्महत्या केल्या असून तालुका खामगांव-४२, शेगांव ११, मलकापुर १५, नांदुरा २३, जळगांव जामोद १९, संग्रामपुर १७, मोताळा २४, बुलढाणा ३६, चिखली ४३, देउळगांव राजा ९, सिंदखेड राजा १५, लोणार २२, मेहकर २९ या प्रमाणे तालुका निहाय शेतकरी व शेतकरी कुटूंबातील सदस्यांनी आत्महत्या केल्या असल्याचे माहे जानेवारी २०१८ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त बाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, बुलढाणा जिल्हयातील वाढत्या शेतकरी आत्महत्या रोखण्याबाबत व अपात्र व प्रलंबित शेतकरी आत्महत्या प्रकरणे मंजूर करणे बाबत शासनाने काय कार्यवाही केली, वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-०६-२०१८) :** (१) होय, अंशत: खरे आहे.

बुलढाणा जिल्हयामध्ये सन २०१७ मध्ये खामगांव-४१, शेगांव-११, मलकापूर-१५, नांदुरा-२३, जळगांव जामोद-१९, संग्रामपूर-१६, मोताळा-२५, बुलढाणा-३७, चिखली-४५, देऊळगांवराजा-१०, सिंदखेडराजा-१७, लोणार-२२, मेहकर-३१ एकूण ३१२ शेतकरी आत्महत्या निदर्शनास आलेल्या आहेत. त्यापैकी १६४ शेतकरी आत्महत्याची प्रकरणे शासन निर्णय दि.२३/०१/२००६ व दि.२७/०२/२००६ मधील निकषान्वये पात्र ठरविण्यात आली असून उर्वरित १४८ प्रकरणे विविध कारणांमुळे अपात्र आहेत.

(२) होय.

(३) बुलढाणा जिल्हयातील वाढत्या शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी जिल्हयात अडचणीत व तणावात असलेल्या शेतकऱ्यांचे सर्वेक्षण करण्यात आले असून यादी तयार करून विविध शासकीय विभागांना पाठवून शासन निर्णयातील निकषानुसार पात्र शेतकरी कुटुंबांना विविध योजनेचा लाभ देण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

शेतकरी आत्महत्या प्रकरणे तातडीने निकाली काढण्याकरिता जिल्हास्तरीय समितीची सभा प्रत्येक सोमवारी आयोजित करून त्यामध्ये पात्र/अपात्रतेचा निर्णय घेण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### गोपीनाथ मुंडे शेतकरी आत्महत्या योजने अंतर्गत विदर्भातील मृत शेतक-यांचे कुटूंब अर्थसहायापासून वंचित असल्याबाबत

**(४५) ११५३२५ (०१-०४-२०१८). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोपानाथ मुंडे शेतकरी आत्महत्या योजने अंतर्गत विदर्भातील अपघातामध्ये मुत्यू झालेल्या शेतक-यांच्या प्रस्ताव पात्र असतांना जयका इन्शुरन्स ब्रोकेश प्रा लि नागपुर या कपंनीकडे प्रलंबीत असून काही प्रस्ताव किरकोळ कारणावरून नाकारत असल्याने या योजने पासून

शेतकरी कुटूंब वंचित राहत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निर्देशनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती प्रलंबीत असलेल्या पात्र प्रस्तावानुसार शेतकरी कुटूंबाला अर्थसहाय देण्यासाठी व किरकोळ कारणे दुर करून शेतकरी कुटूंबाला मदत मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०२-०७-२०१८) :** (१) हे खरे नाही.

गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना, सन २०१७-१८ या वर्षासाठी, दि.०८ डिसेंबर २०१७ ते ०७ डिसेंबर २०१८ या कालावधीदरम्यान, ओरिएन्टल इंशुरन्स कंपनीमार्फत राबविण्यात येत आहे. जायका इंशुरन्स ब्रोकरेज प्रा. लि. ही विमा सल्लागार कंपनी आहे. सदर योजनेंतर्गत, दि.२७ एप्रिल २०१८ अखेरच्या अहवालानुसार, विदर्भातील अमरावती विभागामध्ये एकुण २९० विमा प्रस्ताव विमा कंपनीकडे दाखल झालेले असून, त्यातील १४२ प्रस्तावासंदर्भात शेतकऱ्यांना रक्कम अदा करण्यात आलेली आहे. ३४ प्रस्ताव विमा कंपनीने नामंजूर केलेले आहेत. ११४ प्रस्ताव विमा कंपनीकडे कार्यवाहीत आहेत. तर १४९ प्रस्ताव कागदपत्रांच्या पूर्ततेसाठी प्रलंबित आहेत.

तसेच नागपूर विभागामध्ये एकुण २९९ विमा प्रस्ताव विमा कंपनीकडे दाखल झालेले असून, त्यातील ११८ विमा प्रस्तावांसंदर्भात शेतकऱ्यांना रक्कम अदा करण्यात आलेली आहे. ३५ विमा प्रस्ताव विमा कंपनीने नामंजूर केलेले आहेत. १४६ विमा प्रस्ताव विमा कंपनीकडे कार्यवाहीत आहेत.तर १६३ प्रस्ताव कागदपत्रांच्या पूर्ततेसाठी प्रलंबित आहेत.
(२) व (३) गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेंतर्गत विमा प्रस्ताव शीघ्र गतीने मंजूर होण्यासाठी जिल्हास्तरावर, तसेच, कृषि आयुक्तालय स्तरावर विमा कंपनी व विमा सल्लागार कंपनीचे प्रतिनिधी यांच्या बैठका घेवून त्याबाबत पाठपुरावा करण्यात येतो.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चाळीसगाव (जि.जळगांव) तालुक्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना आर्थिक मदत देण्याबाबत

**(४६) ११५६४४ (०१-०४-२०१८). श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चाळीसगाव (जि.जळगांव) तालुक्यात गेल्या तीन वर्षात ५९ शेतक-यांनी आत्महत्या केली आहे परंतु, यातील फक्त १५ मृत शेतक-यांचे वारसदार शासकीय मदतीस पात्र ठरले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उर्वरित ४४ शेतक-यांची आत्महत्या कौटुंबिक व इतर कारणांमुळे झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, जे शेतकरी पात्र आहेत त्या शेतक-यांना कोणत्या स्वरुपाची मदत देण्यात आली आहे,
(४) असल्यास, चौकशीअंती शासकीय मदतीस पात्र असलेल्यांना १५ मृत शेतक-यांचे वारसदारांना मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

जळगांव जिल्ह्यातील चाळीसगांव तालुक्यात गेल्या तीन वर्षात ५९ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे आढळून आले आहे. शासन निर्णय दिनांक २३ जानेवारी, २००६ मधील निकषानुसार १५ प्रकरणे पात्र असून ४४ प्रकरणे जिल्हास्तरीय समितीने अपात्र ठरविली आहेत.
(२) होय, हे अशंत: खरे आहे.

अपात्र प्रकरणे दिनांक २३ जानेवारी, २००६ च्या शासन निर्णयातील नापिकी, राष्ट्रीयकृत बँक/सहकारी बँक मान्यताप्राप्त सावकारांकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड करू न शकल्यामुळे होणारा कर्जबाजारीपणा व कर्ज परतफेडीचा तगादा या तीन निकषात बसत नसल्यामुळे गेल्या तीन वर्षातील नमूद केलेली प्रकरणे अपात्र ठरविण्यात आलेली आहेत.
(३) व (४) आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटंबाच्या वारसास शासन निर्णयानुसार रू.१,००,०००/- (अक्षरी रूपये एक लाख) आर्थिक मदत देण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी शालेय बसमध्ये "आसनपट्टे" बसवण्याबाबत

**(४७) ११५८९१ (०१-०४-२०१८). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शालेय विद्यार्थ्यांच्या वाहतूक करणाऱ्या बसमधील आसनांना पट्टे (सीटबेल्ट) बसविण्याबाबतची सुचना मुंबई महानगर क्षेत्र प्राधिकरणाने परिवहन आयुक्तांना माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,शालेय बस संघटनांनी आसनपट्टे बसवण्याच्या निर्णयास विरोध केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,प्रस्तूत प्रकरणी नेमण्यात आलेल्या समितीचा अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे काय,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२०-०६-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही. मुबंई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरणाच्या दिनांक १९ जानेवारी, २०१८ रोजीच्या बैठकीत शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करण्याऱ्या वाहनामध्ये शालेय विद्यार्थ्यांसाठी सीट बेल्ट लावण्याबाबत उत्पादक कंपन्यांना कळविण्यात यावे, असे ठरले. त्यानुसार परिवहन

आयुक्त कार्यालयाद्यारा सर्व बस उत्पादक कंपन्यांना दिनांक २ मे, २०१८ रोजीच्या पत्रान्वये सूचना जारी करण्यात आलेल्या आहेत.

तथापि, शालेय बस संघटनानी या निर्णयास विरोध केल्याबाबतचे कोणतेही निवेदन प्राप्त झालेले नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सोयगाव तालुक्यात बोंडअळीच्या बाधीत शेतक-यांचे दाखल झालेले तक्रारअर्ज

**(४८) ११५९०२ (०१-०४-२०१८). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोयगाव तालुक्यात बोंडअळीच्या बाधीत शेतक-यांचे दाखल झालेले तक्रारअर्ज आणि महसूल पथकाच्या रखडलेल्या संयुक्त पंचनाम्याअभावी तालुक्यातील शेतकरी बोंडअळीच्या मदतीपासून दुरावण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संयुक्त पंचनामे झालेल्या शेतक-यांचे खाते आणि आधारकार्ड संकलीत करण्यात येत असल्याने पंचनाम्यापासून वंचित शेतक-यांमध्ये असंतोष पसरला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) सोयगाव तालुक्यात महसूल विभागाच्या तलाठ्याने पिकपे-याच्या नोंदीत मोठ्या प्रमाणावर चुका केल्या असल्याने व शेतक-यांच्या शेती उता-यावर कपाशी ऐवजी इतर पिकपेरे लावण्यात आल्याने काही कपाशी उत्पादक शेतकरी तलाठ्यांच्या चुकांमुळे मदतीस पात्र ठरणार नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पंचनाम्यापासून वंचित शेतक-यांना व ज्या तलाठ्यांमुळे शेतकरी मदतीस अपात्र ठरणार आहेत त्यांच्यावर कारवाई करण्याच्या दृष्टीने शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### वाशिम जिल्हयात विविध विभागाची मुख्यालये स्थापन करण्याबाबत

**(४९) ११६०१४ (१८-०४-२०१८). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्हयाची निर्मिती होवून १९ ते २० वर्षाचा कालावधी होऊनही वाशिम येथे बऱ्याच शासकीय विभागाचे मुख्यालय नसल्यामुळे नागरिकांना विविध कामासाठी अकोला येथे वारंवार जावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाशिम जिल्ह्यात विविध विभागाची मुख्यालये स्थापन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-०६-२०१८) :** (१) होय.
(२) व (३) वाशिम जिल्ह्यातील जनतेच्या गरजेची व दैनंदिन कामकाजाशी संबंधित ५४ जिल्हा कार्यालये स्थापन करण्यात आली आहेत. राज्य शासनांतर्गत उर्वरीत १६ जिल्हा कार्यालये स्थापन करण्याबाबत संबंधित सर्व विभागांना कळविण्यात आले आहे.

---

## राधानगरी-भुदरगड-आजरा तालुक्यामध्ये गोपिनाथ मुंडे अपघात विमा योजनेतील अर्ज प्रलंबित असल्याबाबत

**(५०) ११६१७१ (०१-०४-२०१८). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राधानगरी-भुदरगड-आजरा तालुक्यामध्ये गोपिनाथ मुंडे अपघात विमा योजनेमधून ६५ हून अधिक अर्ज प्रलंबित असून गेले २ वर्षापासुन जिल्हा कृषी अधिक्षक कार्यालयाकडून कोणतीही करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती उक्त प्रलंबित प्रस्तावाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-०७-२०१८) :** (१) हे खरे नाही.
गोपिनाथ मुंडे अपघात विमा योजनेंतर्गत सन २०१५-१६ मध्ये राधानगरी-भूदरगड-आजरा तालुक्यांमधील एकुण २४ प्राप्त प्रस्तावांपैकी २० विमा दावा प्रकरणे मंजूर करुन त्यांची रक्कम अदा करण्यात आलेली आहे व उर्वरीत ४ विमा दावा प्रकरणे नॅशनल इंशुरन्स विमा कंपनीने नामंजूर केलेली आहेत.

सन २०१६-१७ मध्ये राधानगरी-भूदरगड-आजरा तालुक्यांमधील एकुण ३३ प्राप्त विमा दावा प्रकरणांपैकी ११ विमा दावे मंजूर करण्यात आलेली आहेत. उर्वरीत २२ विमा दावा प्रकरणांपैकी ७ विमा दावा प्रकरणे त्रुटीच्या पूर्ततेसाठी प्रलंबित आहेत व १ विमा दावा विमा कंपनीने नामंजूर केलेला आहे. तसेच १४ विमा दावा प्रकरणे तपासणीच्या प्रक्रियेमध्ये विमा कंपनीकडे प्रलंबित आहेत.

(२) व (३) गोपिनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेंतर्गत विमा दावा प्रकरणांच्या मंजुरीबाबत जिल्हास्तरावरुन वेळोवेळी आढावा घेवून योग्य तो पाठपुरावा करण्यात येतो.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.